**वाचा** :- १. महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.AGS १५६७/१३०६८१-C, दि. ९/१०/१९६७

२. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) यांचेकडील परिपत्रक, क्र. एल आर ८४७/ ६८, दि. २९/२/१९६८

३. महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्र. संकिर्ण-२०१८/ प्र.क्र. ३६/ज-१ अ, दि. ०१/०९/२०१८ रोजीच्या पत्रासोबत महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार- ब, दि. २९/८/२०१८ रोजीची अधिसूचना.

४. महसूल व वन विभाग यांचेकडील आदेश क्र. संकीर्ण-२०१८/ प्र.क्र. ३६/ज-१अ, दि. ८/८/२०१९

---

क्र./ भूमापन-३ /विनोंक्र.२७३/२०१९
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि
अभिलेख, (म. राज्य ) पुणे यांचे कार्यालय
पुणे, दिनांक १९/०८/२०१९

## परिपत्रक

**विषय** :- पोटखराब वर्ग-(अ) मधील क्षेत्र जमीन धारकाने लागवडीखाली आणल्यास त्यास लागवडी खालील क्षेत्राच्या आकारणीच्या प्रमाणात अतिरिक्त आकारणी करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती विहीत करुन त्या अनुषंगाने क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्रधिकारी यांना दिशानिर्देश देण्याबाबत.

शासनाकडील क्रमांक संकीर्ण-२०१८/ प्र.क्र. ३६/ ज-१ अ, दि. २९/८/२०१८ च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) (सुधारणा) नियम, २०१८ नुसार महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) नियम, १९६८ च्या नियम २ चा पोट- नियम (२) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे.

" वर्ग (अ) खाली येणारी जमीन, धारकास कोणत्याहीवेळी लागवडीखाली आणता येईल, आणि अशाप्रकारे धारकाने जमीन लागवडीखाली आणल्यास, त्या प्रकरणी लागवडीखालील क्षेत्राच्या आकारणीच्या प्रमाणात, पोटखराब क्षेत्र लागवडीखाली आणल्यामुळे, त्याकरिता जिल्हाधिकारी अतिरिक्त आकारणी करतील."

त्याअनुषंगाने संबंधित महसूली गावातील जमीन धारकाने वर्ग (अ) खाली येणारी जमीन, कोणत्याही लागवडीखाली आणल्यास त्याकरिता गावनिहाय अतिरिक्त आकारणी करावयाच्या कार्यपध्दती बाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. तलाठी यांनी संबंधित गावातील सर्व सर्व्हे / गट नंबर निहाय पोटखराब वर्ग (अ) ची माहिती गाव नमुना नंबर ७/१२ वरुन तयार करावी. ( परिशिष्ट – १अ मधील रकाना क्र. १ ते ५)
२. त्यानंतर गावच्या चावडीमध्ये अथवा दवंडीद्वारे कळवून /स्थळपाहणी करण्यासाठी नोटीस पाठवाव्या. (परिशिष्ट - २ )
३. तलाठी यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पोटखराब वर्ग (अ) क्षेत्र लागवडीखाली आणले असल्याची खात्री करुन तसा जबाब, पंचनामा व हस्तस्केच नकाशा तयार करावा. (परिशिष्ट - ३ )
४. त्यानंतर परिशिष्ट - १ अ मधील रकाना क्रमांक ६ मध्ये पोटखराब वर्ग (अ) क्षेत्र लागवडीखाली आणले आहे काय ? " होय / नाही " नमूद करावे. " होय " असल्यास रकाना क्र. ७ मध्ये क्षेत्र नमुद करावे व जमीन धारकाने

लागवडीखाली आणलेले पोटखराब वर्ग (अ) क्षेत्राबाबत वरील वाचा १ व २ नुसार खात्री करुन रकाना क्रमांक ८ मध्ये " पात्र / अपात्र " नमूद करावे. ( परिशिष्ट - १अ मधील रकाना क्र. ६ ते ८)

५. त्यानंतर परिशिष्ट १ अ मधील पात्र स.नं./गट नंबरची एकत्रित यादी परिशिष्ट १ब मध्ये तयार करावी.

६. तलाठी यांनी परिशिष्ट -१ ब बाबतचा गावनिहाय अहवाल मंडल अधिकारी यांचेकडे सादर करावा.(परिशिष्ट - ४ )

७. मंडल अधिकारी यांनी किमान १०% स.नं. /गट नंबरची स्थळपाहणी करुन पडताळणीअंती शिफारशीसह अहवाल तहसीलदार यांचेकडे सादर करावा. ( परिशिष्ट - ५ )

८. तहसिलदार यांनी गावनिहाय माहिती उपअधीक्षक भूमि अभिलेख यांचेकडे अभिप्रायासाठी पाठवावी. (परिशिष्ट -६)

९. उप अधीक्षक भूमि अभिलेख यांनी संबंधित सर्व्हे नंबर / गट नंबर च्या मूळ वर्गीकरण नकाशा (सर्व्हे नंबरचा गाव नकाशा, प्रतीबूक, प्रतफाळणीबुक, मोजणीबुक इत्यादी ) अभिलेखावरुन गाव नमुना नंबर ७/१२ वर दर्शविलेले क्षेत्र हे पोटखराब वर्ग (**अ**) असल्याची खात्री करावी. तसेच आवश्यक त्या अभिलेखांच्या प्रतीसह जरुर तर जागा पाहणी करुन व सुधारित आकारणी ठरवून अभिप्राय तहसीलदार यांना पाठवावा. (परिशिष्ट - ७ )

१०. तहसिलदार यांनी त्यांचे अभिप्रायासह अहवाल जिल्हाधिकारी / प्राधिकृत सक्षम महसूल अधिकारी यांच्याकडे सादर करावा. (परिशिष्ट - ८ )

११. जमीन धारकाने लागवडीखाली आणलेले क्षेत्र पोटखराब वर्ग (अ) मधील असल्याची खात्री झाल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) नियम, १९६८ अंतर्गत महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) सुधारणा नियम, २०१८ अन्वये सुधारित नियम २ (२) मधील तरतुदी नुसार जिल्हाधिकारी / प्राधिकृत सक्षम महसूल अधिकारी यांनी अंतिम आदेश पारित करावा. (परिशिष्ट - ९ )

१२. जिल्हाधिकारी / प्राधिकृत सक्षम महसूल अधिकारी यांचेकडील आदेशानुसार उपअधीक्षक भूमि अभिलेख यांनी गावनिहाय कमी जास्त पत्रक मंजूर करुन तहसिलदार यांचेकडे गाव वहिवाटीस पाठवावे.

१३. जिल्हाधिकारी / प्राधिकृत सक्षम महसूल अधिकारी यांचेकडील आदेश व उपअधीक्षक भूमि अभिलेख यांचेकडील कमी जास्त पत्रकानुसार तलाठी यांनी अधिकार अभिलेखास गाव नमुना नं. १ व ७ मध्ये अंमल घ्यावा.

१४. उपरोक्त प्रमाणे कार्यवाही झाल्यानंतर त्या गावातील एखाद्या जमीन धारकाचा अर्ज प्राप्त झाल्यास त्यावरही याप्रमाणे कार्यवाही करावी.

१५. उपरोक्त वाचा मधील अनु. क्र. ४ अन्वये शासन मान्यतेनुसार सदरचे परिपत्रक निर्गमित करणेत येत आहे.
सोबत परिशिष्ट १ ते ९ आहेत.

स्वाक्षरी/-

(एस. चोक्कलिंगम्)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे

प्रत : मा.अपर मुख्य सचिव,(महसूल ) महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई - ३२
प्रत : अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक भूमि अभिलेख ( म. राज्य) पुणे
प्रत : विभागीय आयुक्त, पुणे, मुंबई , नाशिक, औरंगाबाद , अमरावती, नागपुर
प्रत : जिल्हाधिकारी, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापुर, सोलापूर, मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी रायगड, ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, अहमदनगर, औरंगाबाद, परभणी , उस्मानाबाद, हिंगोली, जालना , नांदेड, लातूर, बीड , बुलढाणा, अमरावती , यवतमाळ, अकोला, वाशिम, नागपुर, वर्धा, गोंदिया, भंडारा,

गडचिरोली, चंद्रपूर.

२/- आपल्या अधिनस्त सर्व उपविभागीय अधिकारी व सर्व तहसिलदार या कार्यालयांना सदर परिपत्रकाची प्रत पुरविण्यात यावी.

प्रत : उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त, भूमापन, नगर भूमापन, एकत्रीकरण पुणे

प्रत : उपसंचालक भूमि अभिलेख, पुणे, मुंबई , नाशिक, औरंगाबाद , अमरावती, नागपूर

प्रत : जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापुर , सोलापुर, मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग , रत्नागिरी रायगड, ठाणे , पालघर , नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, अहमदनगर, औरंगाबाद , परभणी, उस्मानाबाद, हिंगोली, जालना , नांदेड , लातूर , बीड , बुलढाणा, अमरावती , यवतमाळ , अकोला , वाशिम , नागपुर , वर्धा, गोंदिया , भंडारा, गडचिरोली व चंद्रपूर.

२/- आपल्या अधिनस्त सर्व उप अधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी या कार्यालयांना सदर परिपत्रकाची प्रत पुरविण्यात यावी

प्रत : प्राचार्य, भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी, औरंगाबाद

प्रत: सर्व उपविभागीय अधिकारी

प्रत: सर्व तहसिलदार

प्रत : सर्व उप अधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी.

प्रत : कार्यालय अधीक्षक, आस्था-१,२,३,४, लेखा-१,२,३, भूमापन- १,२, पुनर्मोजणी- १,२, नागरी भूमापन-१,२,३, गावठाण, एकत्रीकरण, रा.भू.अ.आ.का.-१,२,३,४,५ जमाबंदी आयुक्त, कार्यालय पुणे

" निर्गमित "

२१/११/२०१८

(सतिश भोसले)
उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न
जमाबंदी आयुक्त (भूमापन),पुणे

(जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. भूमापन-३ /विनोंक्र. २७३/२०१९, दि.१९/८/२०१९ सोबतचे सहपत्रे )

## परिशिष्ट- १ अ

पोटखराब वर्ग (अ) क्षेत्राबाबतची गावनिहाय माहिती

| अ.क्र. | सर्व्हे नं./ गट नंबर | चालु गाव नमुना नंबर ७/१२ प्रमाणे | | | पोटखराब वर्ग (अ) क्षेत्र लागवडीखाली आणले आहे काय? होय / नाही | पोटखराब वर्ग (अ) मधील लागवडीखाली आणलेले क्षेत्र हे. आर | शेरा (पात्र / अपात्र ) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | धारकाचे नाव | एकुण क्षेत्र हे.आर | पोटखराब वर्ग (अ) क्षेत्र हे.आर | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

दिनांक :- / /
ठिकाण:-

(नाव---- सही/- ---)
मंडल अधिकारी ------------
ता.--------जि.--------

(नाव-- सही/- -----)
तलाठी ----
ता.----- जि.-----

## परिशिष्ट- १ ब

महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) नियम १९६८ मधील नियम २ (२) मध्ये (सुधारणा) करुन नियम, २०१८ दुरूस्तीसाठी पात्र असलेल्या पोटखराब वर्ग (अ) क्षेत्राबाबतची गावनिहाय माहिती

मौजे-----------------ता------------जि----------

| अ.क्र. | सर्व्हे / गट नंबर | चालु गाव नमुना नंबर ७/१२ प्रमाणे | | | लागवडीखाली आणलेले पोटखराब वर्ग (अ) चे क्षेत्र हे.आर |
|---|---|---|---|---|---|
| | | धारकाचे नाव | एकुण क्षेत्र हे.आर | पोटखराब वर्ग (अ) क्षेत्र हे.आर | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

दिनांक :- / /
ठिकाण:-

(नाव-------सही/-)
मंडल अधिकारी ------------
ता.--------जि.--------

(नाव-------सही/- )
तलाठी -------
ता.----- जि.-----

(जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. भूमापन-३ /विनोंक्र. २७३/२०१९, दि.१९/८/२०१९ सोबतचे सहपत्रे )

## परिशिष्ट- २

नोटीस नमुना

---

राज्यातील अधिकार अभिलेखामधील पोटखराब क्षेत्र ब-याच शेतक-यांनी सुधारणा करुन लागवडीयोग्य आणलेले आहे. सदर सुधारणा केलेल्या लागवडीयोग्य क्षेत्राच्या नोंदी अधिकार अभिलेखामध्ये न घेतल्यामुळे शेतक-यांना विविध लाभ मिळत नव्हते. जमीन धारकाने पोटखराब वर्ग (अ) खाली येणारी जमीन लागवडीखाली आणली तरी त्यावर कोणतीही आकारणी करता येत नव्हती. आता शासनाकडील दि. २९/८/२०१८ रोजीचे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) सुधारणा नियम, २०१८ नुसार महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) नियम, १९६८ च्या नियम २ चा पोट- नियम (२) ऐवजी पुढील पोट-नियम दाखल करण्यात आलेला आहे.

" (२) वर्ग (अ) खाली येणारी जमीन, धारकास कोणत्याहीवेळी लागवडीखाली आणता येईल, आणि अशाप्रकारे धारकाने जमीन लागवडीखाली आणल्यास, त्या प्रकरणी लागवडीखालील क्षेत्राच्या आकारणीच्या प्रमाणात, पोटखराब क्षेत्र लागवडीखाली आणल्यामुळे, त्याकरिता जिल्हाधिकारी अतिरिक्त आकारणी करतील."

त्याअनुषंगाने सर्व्हे नं. / गट नंबरमधील पोटखराब वर्ग (अ) क्षेत्रामध्ये जमीन धारकाने सुधारणा करुन ते लागवडीखाली आणले असल्यास सदरचे क्षेत्र पोटखराब वर्ग (अ) मधुन कमी करुन ते लागवडीयोग्य क्षेत्रामध्ये समाविष्ठ करणेत येणार आहे.

त्यानुसार कळविण्यात येते की, मौजे------------- ता.--------जि-------- येथील जमिन धारक यांनी ७/१२ उता-यावरील पोटखराब वर्ग (अ) क्षेत्र लागवडीखाली आणले आहे अगर कसे याबाबत स्थळ पाहणी / चौकशी करण्याकरीता दि. / / ते / / रोजी सकाळी------वाजले पासून गावचे चावडी / ग्रामपंचायतीमध्ये शिबीर आयोजित करण्यात आलेले आहे. तरी वर नमुद तारखेस उपस्थित राहून आवश्यक ती माहिती पुरवून सहकार्य करावे.

दिनांक / /

ठिकाण :-

स्वाक्षरी

(नाव-----------------)
तलाठी -------
ता.----- जि.-----

(जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. भूमापन-३ /विनोंक्र. २७३/२०१९, दि.१९/८/२०१९ सोबतचे सहपत्रे )

## परिशिष्ट- ३

### तलाठी यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केल्यावर करावयाच्या जबाब व पंचनाम्याचा नमुना

---

तलाठी यांचेसमोर मी / आम्ही जमीन धारक व पंच खाली सह्या करणारे कारणे जबाब / पंचनामा नोंदवून देतो / देते की,

मौजे ----------- ता.--------जि--------धारण जमिनीचे धारक व सहधारक यांनी पोटखराब वर्ग (अ) लागवडीलखाली आणले आहे अगर कसे याची स्थळ पाहणी / चौकशी करण्याकरीता दि. / / ते / / रोजी शिबीर आयोजित करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने आपण प्रत्यक्ष जागेवर येवून सर्व्हे नंबर / गट नंबर ---------- ची स्थळ पाहाणी केली असता खालीलप्रमाणे परिस्थिती दिसून आली आहे.

सर्व्हे नं. / गट नं. --------- एकुण क्षेत्र-------- मध्ये पोटखराब वर्ग (अ) ---------- हे.आर असुन सदर सर्व्हे नं. / गट नंबर हा गाव नमुना नंबर ७/१२ नुसार खातेदार श्री. ------------ यांचे नावे आहे. स्थळ पाहणी वेळी खातेदार हे स्वतः / त्यांचे प्रतिनिधी हजर होते. सदर सर्व्हे नं. / गट नं. च्या स्थळ पाहणी वेळी त्यामध्ये जमीन धारकाने सुधारणा करुन सदर पोटखराब वर्ग (अ) ------------हे.आर क्षेत्रावर ---------- हे पिक घेवून ते लागवडीखाली आणले असल्याचे निदर्शनास आले आहे. लागवडीखाली आणलेले पोटखराब वर्ग (अ) क्षेत्र लागवडीयोग्य क्षेत्रामध्ये समाविष्ट करणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी. याबाबत माझी / आमची कोणतीही हरकत नाही, म्हणून हा जबाब नोंदला आहे.

पंच सही

१.--------------------------

२.-------------------------

जमीन धारकाची सही

१.--------------------------

२. --------------------------

ठिकाण :-

दिनांक :- / /

स्वाक्षरी

(नाव----------------)

तलाठी -------

ता.----- जि.-----

(कृपया मागे पहा)

## स्थळ पाहणीचा हस्तस्केच नकाशा

उत्तर

पंच

१.---------------------------

२.---------------------------

जमीन धारकाची सही

१.--------------------------

२.--------------------------

सही /-

(नाव-------------)

तलाठी--------------

ता. जि.

(जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. भूमापन-३ /विनोंक्र. २७३/२०१९, दि.१९/८/२०१९ सोबतचे सहपत्रे )

## परिशिष्ट- ३

### तलाठी यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केल्यावर करावयाच्या जबाब व पंचनाम्याचा नमुना

---

तलाठी यांचेसमोर मी / आम्ही जमीन धारक व पंच खाली सह्या करणारे कारणे जबाब / पंचनामा नोंदवून देतो / देते की,

मौजे ----------- ता.--------जि--------धारण जमिनीचे धारक व सहधारक यांनी पोटखराब वर्ग (अ) लागवडीलखाली आणले आहे अगर कसे याची स्थळ पाहणी / चौकशी करण्याकरीता दि. / / ते / / रोजी शिबीर आयोजित करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने आपण प्रत्यक्ष जागेवर येवून सर्व्हे नंबर / गट नंबर ---------- ची स्थळ पाहाणी केली असता खालीलप्रमाणे परिस्थिती दिसून आली आहे.

सर्व्हे नं. / गट नं. --------- एकुण क्षेत्र-------- मध्ये पोटखराब वर्ग (अ) ---------- हे.आर असुन सदर सर्व्हे नं. / गट नंबर हा गाव नमुना नंबर ७/१२ नुसार खातेदार श्री. ------------ यांचे नावे आहे. स्थळ पाहणी वेळी खातेदार हे स्वतः / त्यांचे प्रतिनिधी हजर होते. सदर सर्व्हे नं. / गट नं. च्या स्थळ पाहणी वेळी त्यामध्ये जमीन धारकाने सुधारणा करुन सदर पोटखराब वर्ग (अ) ------------हे.आर क्षेत्रावर ---------- हे पिक घेवून ते लागवडीखाली आणले असल्याचे निदर्शनास आले आहे. लागवडीखाली आणलेले पोटखराब वर्ग (अ) क्षेत्र लागवडीयोग्य क्षेत्रामध्ये समाविष्ट करणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी. याबाबत माझी / आमची कोणतीही हरकत नाही, म्हणून हा जबाब नोंदला आहे.

पंच सही

१.--------------------------

२.-------------------------

जमीन धारकाची सही

१.-------------------------

२. --------------------------

ठिकाण :-

दिनांक :- / /

स्वाक्षरी

(नाव---------------)

तलाठी -------

ता.----- जि.-----

(कृपया मागे पहा)

(जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. भूमापन-३ /विनोंक्र. २७३/२०१९, दि.१९/८/२०१९ सोबतचे सहपत्रे )

## परिशिष्ट- ४

### तलाठी यांनी मंडल अधिकारी यांचेकडे सादर करावयाच्या अहवाल नमुना

---

क्रमांक-------------------------------/
तलाठी,----------
ता-------- जि.--------- याचे कार्यालय
दिनांक / /

प्रति
मंडल अधिकारी , ------------- ता.-----------जि.---------------

**विषय** :- पोटखराब वर्ग-(अ) मधील क्षेत्र लागवडीखाली आणलेने त्यास आकारणी करणेबाबत.
मौजे-----------ता.----------जि.---------------

**संदर्भ** :- मा. जमाबंदी आयुक्त, पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक भूमापन-३ / विनोंक्र. २७३/२०१९, दि. १९/०८/२०१९

पोटखराब वर्ग (अ) खाली येणारी जमीन, धारकाने कोणत्याही लागवडीखाली आणल्यास त्याकरीता गावनिहाय आकारणी करावयाच्या कार्यपध्दती बाबत संदर्भीय पत्रान्वये सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार मौजे ------------ ता. --------------- जि.-------- येथील परिशिष्ट- १ प्रमाणे माहिती तयार करुन नोटीसीद्वारे कळवून दि. / / रोजी स्थळपाहणी करण्यात आलेली आहे.

शासन निर्णय दि. ०९/१०/१९६७ व जमाबंदी आयुक्त, पुणे यांचेकडील परिपत्रक दि. २९/२/१९६८ अन्वये कार्यवाही झालेल्या सन --------च्या गाव नमुना नंबर ७/१२ वर पोटखराब क्षेत्र हे वर्ग ( अ ) मध्ये नमुद आहे. याबाबत खात्री केली आहे. (सदर गाव नमुना नंबर ७/१२ नक्कल प्रत प्रकरणी सामील केली आहे.) मौजे-------------ता--------- जि--------येथील सर्व्हे नं./ गट नं. मध्ये प्रत्यक्ष जागेवर जावुन स्थळ पाहणी / चौकशी / करण्यात आलेली आहे.

पोटखराब वर्ग (अ) लागवडीखाली आणलेल्या क्षेत्राबाबत जबाब व पंचनामा नोंदविण्यात आलेला आहे. त्यांचे जबाबावरुन अर्जदार यांच्या मौजे............येथील सर्व्हे नं./गट नं. मधील पोटखराब वर्ग ( अ ) मधील क्षेत्र ------हे.आर ही जमीन अर्जदार यांनी लागवडीखाली आणली असल्याचे निदर्शनास येते.

स्थळ पाहणी / चौकशी, जबाब / पंचनामा व वस्तुस्थिती विचारात घेता मौजे--------ता.--------जि.-------येथील परिशिष्ट - १ मधील अ. क्र. १ ते ------ मधील पोटखराब वर्ग (अ) या क्षेत्राचा लागवडीयोग्य क्षेत्रात समावेश करण्यास हरकत नाही.

तरी महाराष्ट्र जमीन महसूल (जमीनीच्या वापरावर निर्बंध) सुधारणा नियम २०१८ अन्वये परिशिष्ट – १ अ. क्र. १ ते-----. सर्व्हे नं./गट नं. नमूद केलेले पोटखराब वर्ग (अ) या क्षेत्राचा लागवडीयोग्य क्षेत्रात समावेश करून सदर क्षेत्राची संबंधित सर्व्हे नं./ गट नं. च्या आकारणीच्या प्रमाणात अतिरिक्त आकारणी करणेबाबत पुढील कार्यवाही होणेस विनंती आहे.

सोबत पानांक १ ते आहेत

सही /-
तलाठी-------
ता.-----जि.--------

ठिकाण :-
दिनांक :- / /

(जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. भूमापन-३ /विनोंक्र. २७३/२०१९, दि.१९/८/२०१९ सोबतचे सहपत्रे )

## परिशिष्ट- ५

### मंडल अधिकारी यांनी तहसिलदार यांचेकडे सादर करावयाचा अहवाल नमुना

---

क्रमांक-----------------------------/
मंडल अधिकारी,----------
ता.---------जि.--------- याचे कार्यालय
दिनांक / /

प्रति
मा. तहसिलदार------------- जि.----------------

**विषय :-** पोटखराब वर्ग-(अ) मधील क्षेत्र लागवडीखाली आणलेने त्यास आकारणी करणेबाबत.
मौजे-----------ता.----------जि.---------------
**संदर्भ :-** तलाठी---------यांचेकडील पत्र क्रमांक ----------------------दि.------------

तलाठी मौजे .......... ता. ............... जि.--------यांचेकडून गावनिहाय पोटखराब वर्ग (अ) क्षेत्र लागवडीखाली आणले बाबत परिशिष्ट १ ब माहितीसह अहवाल प्राप्त झालेला आहे. याबाबत शासन निर्णय दि. ०९/१०/१९६७ व जमाबंदी आयुक्त, पुणे यांचेकडील परिपत्रक दि. २९/२/१९६८ सन --------च्या गाव नमुना नंबर ७/१२ वर पोटखराब क्षेत्र हे वर्ग अ मध्ये नमुद असले बाबतची खात्री केली आहे. (सदर गाव नमुना नंबर ७/१२ नक्कल प्रत प्रकरणी सामील केली आहे.) त्यानुसार सदर अहवालाच्या अनुषंगाने गावनिहाय प्राप्त यादीमधील अहवालाची १०% सर्व्हे नं. / गटनंबरची स्थळ पाहणी करुन तपासणी करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने सादर करणेत येते की, तलाठी------------यांनी मौजे-------------ता-----------जि------------ येथील परिशिष्ट – १ ब अ. क्र. १ ते ------. सर्व्हे नं./ गट नं. मध्ये प्रत्यक्ष जागेवर जावुन स्थळ पाहणी / चौकशी करण्यात आलेली आहे. पोटखराब वर्ग (अ) लागवडीखाली आणलेल्या क्षेत्राबाबत जबाब व पंचनामा नोंदविण्यात आलेला आहे. त्यांचे जबाबावरुन अर्जदार यांच्या मौजे-------येथील सर्व्हे नं./ गट नं. परिशिष्ट - १ ब अ. क्र. १ ते ---- मधील पोटखराब वर्ग (अ ) ही जमीन धारकाने लागवडीखाली आणली आहे.

सदर प्रकरणात तलाठी--------- यांनी स्थळ पाहणी, सहहिस्सेधारकाचे जबाब / पंचनामा व सदर प्रकरणातील वरीलप्रमाणे वस्तुस्थिती विचारात घेता मौजे.........येथील परिशिष्ट – १ ब मधील अ. क्र. १ ते ------ सर्व्हे नं./ गट नं मधील पोटखराब वर्ग (अ) या क्षेत्राचा लागवडीयोग्य क्षेत्रात समावेश करुन त्यास आकारणी करण्यास हरकत नाही.

महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) सुधारणा नियम २०१८ अन्वये वरीलप्रमाणे नमूद केलेल्या पोटखराब वर्ग (अ) परिशिष्ट – १ ब अ. क्र. १ ते ------या क्षेत्राचा लागवडीयोग्य क्षेत्रात समावेश करून त्याचा सदर स.नं./ग.नं. मधील सद्यःस्थितीतील एकुण लागवडीखालील क्षेत्राच्या आकारणीच्या प्रमाणात अतिरिक्त आकारणी करणेबाबत पुढील कार्यवाही होणेस विनंती आहे.

स्वाक्षरी
(नाव---------------)
मंडल अधिकारी -------
ता.----- जि.-----

(जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. भूमापन-३ /विनोंक्र. २७३/२०१९, दि.१९/८/२०१९ सोबतचे सहपत्रे )

## परिशिष्ट- ६

(तहसिलदार यांनी उप अधीक्षक भूमि अभिलेख यांचेकडून अभिप्राय मागणी करावयाच्या पत्राचा नमुना)

---

क्रमांक-----------------------------/
तहसिलदार,----------
ता.--------- जि.--------- याचे कार्यालय
दिनांक / /

प्रति
उप अधीक्षक भूमि अभिलेख -----------------जि.----------------

**विषय** :- पोटखराब वर्ग-(अ) मधील क्षेत्र लागवडीखाली आणलेने त्यास आकारणी करणेबाबत.
मौजे-----------ता.----------जि.---------------

**संदर्भ** :- मंडल अधिकारी---------यांचेकडील पत्र क्रमांक ----------------------दि.------------

विषयांकित बाबत मौजे.............ता.-----------जि.----------येथील परिशिष्ट – १ ब अ. क्र. १ ते ------ बाबत सर्व्हे नंबर / गट नंबर च्या मूळ वर्गीकरण नकाशा (सर्व्हे नंबर गाव नकाशा, प्रतीबूक, प्रतफाळणीबुक, मोजणीबुक इत्यादी ) अभिलेखावरुन गाव नमुना नंबर ७/१२ वर दर्शविलेले पोटखराब वर्ग (अ) क्षेत्रा बाबत खात्री करावी व जरुर तर जागापाहणी करावी. तसेच आवश्यक त्या अभिलेखाच्या नक्कल प्रतीसह व खालील प्रपत्र अ मध्ये दुरुस्ती आकारणी ठरवुन इकडील कार्यालयाकडे पाठवावे.

### प्रपत्र-अ

| अ. क्र. | परिशिष्ट १ ब प्रमाणे स.नं. हिस्सा नं./ग.नं. | सद्यास्थितीनुसार | | | | प्रस्तावित दुरुस्ती नुसार | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लागवडी खालील क्षेत्र हे.आर | पोटखराब क्षेत्र हे.आर | आकार रु. पै. | लागवडीखाली आणलेले पोटखराब वर्ग (अ) क्षेत्र हे.आर | लागवडीखालील क्षेत्र हे.आर ३ + ६ | पोटखराब क्षेत्र हे.आर ४ - ६ | आकार रु. पै. | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

सोबत पानांक १ ते असत.

स्वाक्षरी/-
तहसिलदार -------

(जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. भूमापन-३ /विनोंक्र. २७३/२०१९, दि.१९/८/२०१९ सोबतचे सहपत्रे )

परिशिष्ट- ७

(उप अधीक्षक भूमि अभिलेख यांनी तहसिलदार यांचेकडे सादर करावयाचा अहवालाचा नमुना)

---

क्रमांक------------------------------/
उप अधीक्षक भूमि अभिलेख,----------
ता.--------- जि.--------- याचे कार्यालय
दिनांक / /

प्रति
तहसिलदार------------- जि.----------------

**विषय** :- पोटखराब वर्ग-(अ) मधील क्षेत्र लागवडीखाली आणलेने त्यास आकारणी करणेबाबत.
मौजे-----------ता.----------जि.---------------
**संदर्भ** :- आपलेकडील पत्र क्रमांक ----------------------दि.------------

मौजे--------ता.-----------जि.----------येथील सर्व्हे नंबर / गट नंबर परिशिष्ट - १ ब, अ. क्र. १ ते ------ मधील पोटखराब वर्ग (अ) क्षेत्र लागवडीखाली आणले आहे. सदर सर्व्हे नंबर / गट नंबर पोटखराब वर्ग (अ) क्षेत्राची मुळ अभिलेखावरून पडताळणी करुन आवश्यक त्या अभिलेखाच्या नक्कल प्रतीसह व प्रपत्र अ मध्ये दुरुस्ती आकारणी ठरवुन इकडील कार्यालयाकडे पाठवीणेबाबत सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

त्यानुसार मौजे-----------ता.-----------जि.---- येथील परिशिष्ट — १ ब अ. क्र. १ ते ------ माहिती गावचे आकारबंदनुसार क्षेत्राचा तपशिल, दुरुस्ती आकारणी प्रपत्र अ मध्ये तयार करुन यासोबत पाठविणेत आलेले आहे. तसेच उपलब्ध अभिलेखाच्या नक्कला सोबत जोडल्या आहेत. तरी पुढील कार्यवाही होणेस विनंती आहे.

सोबत पानांक १ ते असत.

उप अधीक्षक भूमि अभिलेख -------

**प्रपत्र-अ**

| अ. क्र. | परिशिष्ट १ ब प्रमाणे स.नं. हिस्सा नं./ग.नं. | सद्यास्थितीनुसार | | | | प्रस्तावित दुरुस्ती नुसार | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लागवडी खालील क्षेत्र हे.आर | पोटखराब क्षेत्र हे.आर | आकार रु. पै. | लागवडीखाली आणलेले पोटखराब वर्ग (अ ) क्षेत्र हे.आर | लागवडीखालील क्षेत्र हे.आर ३ + ६ | पोटखराब क्षेत्र हे.आर ४ - ६ | आकार रु. पै. | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

टिप:- १. पोटखराब क्षेत्राबाबत उल्लेख असलेल्या अभिलेखाचा तपशिल सर्व्हे नं. नकशा / प्रतिबुक / टिपण/ मोजणीबुक / फाळणी इत्यादी यापैकी ज्या अभिलेखमध्ये पोटखराब क्षेत्राचा स्पष्टपणे उल्लेख असेल त्याअभिलेखाच्या साक्षांकित नक्कला अहवालासोबत सादर कराव्यात.

२. वर्ग (अ) खाली येणारी जमीन, धारकाने कोणत्याही लागवडीखाली आणल्यास त्याकरिता लागवडीखालील क्षेत्राच्या आकारणीच्या प्रमाणात आकारणी करण्यात यावी.

(जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. भूमापन-३ /विनोंक्र. २७३/२०१९, दि.१९/८/२०१९ सोबतचे सहपत्रे )

# परिशिष्ट- ८

तहसिलदार यांनी जिल्हाधिकारी / प्राधिकृत सक्षम महसूल अधिकारी यांचेकडे सादर करावयाचा अहवालाचा नमुना

---

क्रमांक-----------------------------/
तहसिलदार,----------
ता.---------जि.--------- याचे कार्यालय
दिनांक / /

प्रति
मा. जिल्हाधिकारी / प्राधिकृत सक्षम महसूल अधिकारी
ता.-----------जि.--------

**विषय** :- पोटखराब वर्ग-(अ) मधील क्षेत्र लागवडीखाली आणलेने त्यास आकारणी करून ७/१२ वर दूरुस्ती करणेबाबत.
मौजे-----------ता.----------जि.--------------

**संदर्भ** :- १. मंडल अधिकारी---------यांचेकडील पत्र क्रमांक ----------------------दि.------------
२. उप अधीक्षक भूमि अभिलेख,---------- यांचेकडील पत्र क्र.-----------दि.------------

विषयांकित बाबत संदर्भ क्र. १ व २ अन्वये प्राप्त अहवालानुसार सादर करणेत येते की, तलाठी -----------यांनी मौजे---------ता---------जि--------येथील सर्व्हे नं./ गट नं. परिशिष्ट -१ ब अ. क्र. १ ते ------- ची प्रत्यक्ष जागेवर जावुन स्थळ पाहाणी करण्यात आलेली आहे. पोटखराब वर्ग (अ) लागवडीखाली आणलेल्या क्षेत्राबाबत जबाब व पंचनामा नोंदविण्यात आलेला आहे. त्यानुसार मंडल अधिकारी -------- यांनी परिशिष्ट १ ब यादीमधील सर्व्हे नंबर / गट नंबरची १० % तपासणी करण्यात आलेली आहे. धारकाचे जबाबावरुन मौजे--------येथील सर्व्हे नंबर / गट नंबर मधील पोटखराब अ मधील ही जमीन अर्जदार यांनी लागवडीखाली आणली असल्याचे निदर्शनास येते. तसेच शासन निर्णय दि. ०९/१०/१९६७ व जमाबंदी आयुक्त, पुणे यांचेकडील परिपत्रक दि. २९/२/१९६८ मधील सुचनेनुसार पोटखराब वर्ग अ क्षेत्राबाबत खात्री केली आहे.

सदर प्रकरणात तलाठी-------- यांनी स्थळ पाहणी / चौकशी, जबाब / पंचनामा व सदर प्रकरणातील वरीलप्रमाणे वस्तुस्थिती विचारात घेता मौजे-----------येथील परिशिष्ट -१ ब मधील अ.क्र. १ ते ------- मधील पोटखराब वर्ग (अ) क्षेत्राचा लागवडीयोग्य क्षेत्रात समावेश करण्यास हरकत नाही.

ज्याअर्थी महाराष्ट्र जमीन महसूल (जमीनीच्या वापरावर निर्बंध) सुधारणा नियम २०१८ अन्वये वरीलप्रमाणे नमूद केलेल्या पोटखराब वर्ग (अ) परिशिष्ट -१ ब मधील अ.क्र. १ ते ------- मध्ये नमुद केलेनुसार क्षेत्राचा लागवडीयोग्य क्षेत्रात समावेश करून एकुण लागवडीखालील क्षेत्राच्या आकारणीच्या प्रमाणात अतिरिक्त आकारणी करणेबाबत पुढील कार्यवाही होणेस विनंती आहे.

सोबत पानांक १ ते आहेत.

सही /-
तहसिलदार -------
ता.-----जि.--------

(जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. भूमापन-३ /विनोंक्र. २७३/२०१९, दि.१९/८/२०१९ सोबतचे सहपत्रे )

## परिशिष्ट -९

## आदेश नमुना

वाचा :- १. महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) ) नियम, १९६८ व महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध ) (सुधारणा) नियम, २०१८ अन्वये सुधारीत नियम २ (२)

२. तहसिलदार ------- ता.----जि.-----यांचेकडील क्र.----------दि. / / रोजीचा अहवाल

---

क्रमांक----------------------------/
जिल्हाधिकारी / प्राधीकृत सक्षम महसूल अधीकारी ---------------ता------ जि.------
यांचे कार्यालय
दिनांक / /

**आदेश :-**

राज्यातील ब-याच शेतक-यांनी पोटखराब वर्ग (अ) क्षेत्र सुधारणा करुन लागवडीयोग्य केलेले आहेत. त्या क्षेत्राच्या नोंदी अधिकार अभिलेखामध्ये न घेतल्यामुळे शेतक-यांना पीक कर्ज, पीक विमा, नैसर्गिक आपत्तीत पिकांचे होणा-या नुकसानीचा मोबदला इ. मिळत नसल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच पिकाखाली असलेले पोटखराब क्षेत्रातील शेती उत्पादनाचा नियोजनाचे कामात विचार केला जात नाही. यापूर्वी पोटखराब म्हणून नोंद असलेले क्षेत्र धारकास लागवडीखाली आणता येत होते. परंतु त्यावर महसूलाची आकारणी करता येत नव्हती आता शासनाकडील दि. २९/८/२०१८ रोजीचे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) सुधारणा नियम, २०१८ नुसार महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) नियम, १९६८ च्या नियम २ चा पोट- नियम (२) मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. त्याअन्वये धारकाने पोटखराब क्षेत्र लागवडीखाली आणल्यास, त्या प्रकरणी लागवडीखालील क्षेत्राच्या आकारणीच्या प्रमाणात, पोटखराब क्षेत्र लागवडीखाली आणल्यामुळे, त्याकरिता अतिरिक्त आकारणी करण्यात येईल. अशी तरतूद करण्यात आली आहे.

ज्याअर्थी तहसिलदार यांचेकडील पत्र क्र.--------------------अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) नियम, १९६८ अंतर्गत महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) सुधारणा नियम, २०१८ अन्वये सुधारीत नियम २ (२) नुसार मौजे--------------ता.-------जि.-------- परिशिष्ट -१ ब मधील अ. क्र. १ ते ------- मध्ये नमुद केलेनुसार पोटखराब वर्ग (अ) मधील क्षेत्र लागवडीखाली आणल्यामुळे सदर क्षेत्राचा संबंधित सर्व्हे नं./गट नं. मधील लागवडीयोग्य क्षेत्रामध्ये समावेश करुन अतिरिक्त आकारणी निश्चित करण्याकरीता या कार्यालयाकडे अहवाल प्राप्त झालेला आहे. आणि ज्याअर्थी :-

१) सदर प्रकरणात मौजे-----------ता.-------जि.--------- येथील परिशिष्ट -१ ब मधील अ. क्र. १ ते ------- मधील पोटखराब वर्ग (अ) जमीन लागवडीखाली आणल्याबाबत तलाठी सजा------------यांचेसमोर जमीन धारक व पंच यांनी जबाब नोंदविले आहेत.

२) दि. / / रोजीचा मंडळ अधिकारी यांचा सदर लागवडीखाली आणलेले क्षेत्र लागवडीयोग्य असल्याबाबत अहवालात नमूद आहे.

३) उपअधीक्षक भूमि अभिलेख,-------- यांचेकडील दि.  /  /   रोजीचा अहवाल तसेच पोटखराब वर्ग अ क्षेत्र असले बाबत उल्लेख असलेल्या अभिलेखाची नक्कल प्रत व दुरुस्ती आकारणीचा तपशील **प्रपत्र - अ** प्राप्त झाले आहे.

आणि ज्याअर्थी वरील अहवालच्या पडताळणीअंती मौजे-----------ता.---------जि.----------येथील **प्रपत्र - ब** यादीमधील पोटखराब वर्ग (अ) मधील ही जमीन धारकाने लागवडीखाली आणली असल्याचे निदर्शनास येते.

आणि ज्याअर्थी सदर प्रकरणात जमीन धारकांचे जबाब व पंचनामा त्यासोबतची कागदपत्रे, तलाठी व मंडल अधिकारी यांचे स्थळ पाहणी अहवाल व मुळ अभिलेख विचारात घेता मी ---------------- जिल्हाधिकारी / प्राधीकृत सक्षम महसूल ------- मौजे--------------ता.------------जि.-------------येथील पोटखराब वर्ग (अ) या क्षेत्राचा लागवडीयोग्य क्षेत्रात समावेश करण्याच्या निष्कर्षाप्रत आलो आहे.

त्याअर्थी महाराष्ट्र जमीन महसूल (जमीनीच्या वापरावर निर्बंध) नियम १९६८ व सुधारणा नियम, २०१८ अन्वये सुधारीत नियम २ (२) नुसार मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून मी वरीलप्रमाणे नमूद केलेल्या **प्रपत्र - ब** यादीमधील पोटखराब वर्ग (अ) या क्षेत्राचा लागवडीयोग्य क्षेत्रात समावेश करून सदर क्षेत्राची सर्व्हे नंबर/गट नंबर मधील सद्य:स्थितीतील एकुण लागवडीखालील क्षेत्राच्या आकारणीच्या प्रमाणात प्रपत्र ब मध्ये नमुद केल्याप्रमाणे अतिरिक्त आकारणी करण्यास मान्यता देत आहे. सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करणेची आहे.

सोबत प्रपत्र ब असे.

ठिकाण :-

जिल्हाधिकारी / प्राधीकृत सक्षम महसूल अधिकारी-----

दिनांक :-  /  /

प्रत :- तहसिलदार-------- यांचेकडे पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

प्रत :- उपअधीक्षक भूमि अभिलेख-----. यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

२/- सदर आदेशाच्या अनुषंगाने नियमानुसार कमी जास्त पत्रक तयार / मंजुर करुन तहसिलदार--------- यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे.

**प्रपत्र-ब**

| अ.क्र. | जमीन धारकाचे नाव (७/१२ प्रमाणे) | स.नं. हिस्सा नं./ग.नं. | **सद्यास्थितीनुसार** | | | लागवडी खाली आणलेले पोटखराब वर्ग अ क्षेत्र हे.आर | **दुरुस्तीनुसार** | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | लागवडी खालील क्षेत्र हे.आर | पोटखराब क्षेत्र वर्ग अ हे.आर | आकार रु. पै. | | लागवडी खालील क्षेत्र हे.आर ४+७ | पोटखराब क्षेत्र हे.आर ५-७ | आकार रु. पै. | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

सही/-

(नाव---------------------------)

जिल्हाधिकारी /

प्राधीकृत सक्षम महसूल अधिकारी ---------